# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY**

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade




## STUDENT WELFARE DEPARTMENT


**Phone: (02462) 229525**
**Fax : (02462) 229572**
**Website: www.srtmun.ac.in** **E-mail: dswsrtmunm@gmail.com**


जा.क्र.वि.क/हु/दिन/२०१५–१६/१०७–४९३ दि.२८/०१/२०१६

प्रति,
प्राचार्य,
सर्व सलग्नित महाविद्यालये,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,
नांदेड.

विषय : शनिवार, दि.३० जानेवारी, २०१६ रोजी सकाळी ११:०० वा. दोन मिनिटे मौन पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत.
संदर्भ : महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक जपुती २२१६/मुसका–३/प्र.क्र. २७/२९, दि.२७ जानेवारी, २०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दि.३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर २ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी,ही विनंती.

स्वाक्षरीत/–
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग.

प्रत माहितीस्तव :
श्री.अजय दर्शनकार, सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding Hutatma Din या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील New/Circular-School, Administration सदरातंर्गत प्रसिध्दि्स देण्यात यावे.

शनिवार,दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक जपुती २२१६ /मुसका-३/प्र.क्र.२७/२९**
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख: - २७ जानेवारी,२०१६

# परिपत्रक

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर २ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शनिवार दिनांक ३० जानेवारी,२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/ कर्मचारी/ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, ठिक ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा ११.०३ मिनीटांपर्यंत वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभिरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१२७११३५४९०४०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**र.ग.पांचाळ**
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
४. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
५. सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई